RNI New Delhi-MAHMAR/2011/41080

साप्ताहिक भारतभर वितरीत होणारे

# लेवा जगत

संपादक : शाम वसंत पाटील

Book - Post

Parvana(Subs.5000)/L-218/RNP-BH-91/2023-2025

To,

वितरीत न झाल्यास परत पाठवण्याचा पत्ता :–
साप्ताहिक लेवा जगत
वंजारवाडी मु. पो. सावदा ता. रावेर, जि. जळगांव (महा.) ४२५ ५०२



## नवी पिढी प्रश्न विचारते, त्यांच्याशी संवाद साधा; मोहन भागवत



दिल्ली: 'पूर्वीचा काळ हा केवळ आज्ञा पालनाचा होता, मात्र आता काळ बदलला आहे. आजची नवी पिढी प्रत्येक गोष्टीवर प्रश्न विचारते आणि त्यांना प्रत्येक गोष्टीमागील तर्क समजावून सांगणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे घरोघरी आदेश देण्याऐवजी मुलांशी संवाद साधायला हवा. कुटुंबात 'डिप्रेशन' नाही, तर 'डिस्कशन' व्हायला हवे,' असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केले.

# अखेर धर्मेंद्र प्रधानांनी शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला

### जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मोठं यश




**गेल्या 35 दिवसांपासून दिल्लीतील जंतर मंतर येथे सुरु असलेल्या कॉकरोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांकडून सुरु असलेल्या आंदोलनाला अखेर यश आले आहे.**

नवी दिल्ली–

गेल्या 35 दिवसांपासून दिल्लीतील जंतर मंतर येथे सुरु असलेल्या कॉकरोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांकडून सुरु असलेल्या आंदोलनाला अखेर यश आले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी दुपारी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळात एखाद्या आंदोलनानंतर किंवा आरोपांनंतर केंद्रीय मंत्र्याला राजीनामा द्यावा लागण्याची ही पहिलीच वेळ आहे. कॉकरोच जनता पार्टी आणि जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्याच्या मागणीबाबत कोणतीही तडजोड करणार नाही, असा इशारा देत आंदोलन आणखी तीव्र करण्याची इशारा दिला होता. दिल्लीतील या आंदोलनाचे लोण मुंबई, राजस्थान, बिहार, गुवाहाटी अशा सर्वच राज्यांमध्ये पसरले होते. त्यामुळे आंदोलनाची व्याप्ती आणखी वाढून केंद्र सरकाविरोधात असंतोष वाढत चालला होता. त्यामुळे केंद्र सरकारला अखेर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा लागला आहे.

दरम्यान, धर्मेंद प्रधान यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, जंतर–मंतरवर आणि देशात जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्या परिस्थितीचा राष्ट्रविरोधी शक्तींनी कोणताही फायदा घेऊ नये, देशाची एकता टिकून राहावी, एकाही विद्याथ्यार्चे भविष्य कायदेशीर अडचणीत सापडू नये आणि आपल्या मुलांनी त्यांचा वेळ अभ्यास व करिअर बनवण्यावर घालवावा, याच विचाराने मी माझा राजीनामा मा. पंतप्रधानांकडे पाठवून दिला आहे. देशभरात NEET-UG परीक्षेतील कथित घोटाळयावरून पेटलेला वणवा आणि दिल्लीतील जंतर–मंतरवर सुरू असलेल्या तीव्र आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी मोठा निर्णय घेतला आहे. 'जंतर–मंतरवर आणि देशात जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्या परिस्थितीचा राष्ट्रविरोधी शक्तींनी कोणताही फायदा घेऊ नये, देशाची एकता टिकून राहावी, एकाही विद्याथ्यार्चे भविष्य कायदेशीर अडचणीत सापडू नये आणि आपल्या मुलांनी त्यांचा वेळ अभ्यास व करिअर बनवण्यावर घालवावा, याच विचाराने मी माझा राजीनामा मा. पंतप्रधानांकडे पाठवून दिला आहे,' अशा शब्दांत स्पष्टीकरण देत त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा सादर केला आहे.

## पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत केसी पार्कमध्ये भव्य वृक्षारोपण

### श्री अष्टविनायक शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळाचा उपक्रम; महिला व बालकांच्या 'वृक्ष दिंडी'ने वेधले लक्ष



जळगाव लेवाजगत न्यूज प्रतिनिधी–

पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने श्री अष्टविनायक शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ, जळगाव यांच्या वतीने केसी पार्क परिसरात भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. महिला, बालके आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे परिसरात पर्यावरण जनजागृतीचे प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलेली 'वृक्ष दिंडी' मोठ्या उत्साहात काढण्यात आली. महिला व बालकांनी हातात विविध वृक्षांची रोपे, पर्यावरण जनजागृतीचे फलक आणि झाडे लावा, झाडे जगवा , एक वृक्ष – एक जीवन अशा घोषणांनी केसी पार्क परिसर दुमदुमून सोडला. दिंडीद्वारे पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

यानंतर परिसरात विविध पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. उपस्थितांनी वृक्षांचे संगोपन करण्याची शपथ घेत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुनील वाणी यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, आज लावलेला प्रत्येक वृक्ष ही पुढील पिढ्यांसाठी दिलेली अमूल्य भेट आहे. केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर त्यांचे संगोपन करणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे.

कार्यक्रमाला सुनील वाणी, सोनाली वाणी, दुर्गा पाटील, तेजस्विनी, भूषण लाडवांजारी यांच्यासह परिसरातील महिला, बालके आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सक्रिय सहभागामुळे हा पर्यावरणपूरक उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

श्री अष्टविनायक शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने भविष्यातही पर्यावरण संवर्धनासाठी अशा सामाजिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

## गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग एनएसएस विभागातर्फे नाशिराबादेत हरीत यज्ञ उत्साहात




लेवाजगत न्यूज जळगाव, दि. २३ :–पर्यावरण संवर्धनाची जाणीव समाजात रुजविण्यासाठी आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग, जळगावच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागातर्फे नाशिराबाद येथे हरीत यज्ञ विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

या उपक्रमात प्रा. अँजेला एलिस, प्रा.निलेश शिरसाट यांच्या मार्गदर्शनानुसार चतुर्थ वर्ष विद्यार्थी, प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.हरीत यज्ञाची सुरुवात पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पाने झाली. यावेळी पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी हवामान बदल, वृक्षसंवर्धन, जैवविविधतेचे महत्त्व आणि प्रदूषणमुक्त पर्यावरण या विषयांवर आकर्षक व आशयपूर्ण पोस्टर्स सादर केले.

## रक्तदान व थॅलेसेमिया तपासणीद्वारे सामाजिक बांधिलकी जपणारा विवेकानंद एज्युकेशन सोसायटी महाविद्यालयाचा उपक्रम



उरण सुनिल ठाकूर

विवेकानंद एज्युकेशन सोसायटीच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाने (स्वायत्त) राष्ट्रीय सेवा योजना (ठरर) आणि रोटरी क्लब ऑफ चेंबूर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर व थॅलेसेमिया तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

या उपक्रमासाठी एस. एल. रहेजा रुग्णालय आणि लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय येथील रक्तपेढ्यांनी सहकार्य केले. शिबिरात विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत ७२ जणांनी स्वेच्छेने रक्तदान केले. त्यातून एकूण ३२,४०० मिली रक्त संकलित करण्यात आले. तसेच ११६ विद्यार्थ्यांची थॅलेसेमिया तपासणी करण्यात आली. या माध्यमातून आनुवंशिक रक्तविकारांच्या लवकर निदानाबाबत जनजागृती होण्यास आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेबाबत जागरूकता वाढण्यास मदत झाली.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनीता कंवर यांनी सांगितले की, शिक्षण हे केवळ वर्गखोल्यांपुरते मर्यादित नसून सामाजिकदृष्ट्या जबाबदार नागरिक घडविणे हे महाविद्यालयाचे प्रमुख ध्येय आहे. विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग त्यांच्या सेवाभावाचा आणि समाजासाठी योगदान देण्याच्या वचनबद्धतेचा प्रत्यय देणारा आहे.

### केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या प्रयत्नाने भुसावळहून वारकरी विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे

# भुसावळहून विशेष आषाढी रेल्वे रवाना



भुसावळ (प्रतिनिधी): आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांची सोय लक्षात घेऊन केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या विशेष प्रयत्नातून भुसावळ येथून पंढरपूरसाठी विशेष आषाढी रेल्वे रवाना करण्यात आली. या विशेष रेल्वेमुळे उत्तर महाराष्ट्रातील हजारो वारकऱ्यांना विठुरायाच्या दर्शनासाठी सुलभ, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली.

रेल्वे रवाना होताना स्थानक परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. वारकऱ्यांनी टाळ–मृदुंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा–तुकाराम , पांडुरंग हरी च्या जयघोषात विठ्ठल नामस्मरण करत पंढरपूरकडे प्रस्थान केले.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी वारकऱ्यांना शुभेच्छा देत त्यांच्या सुखरूप आणि मंगलमय यात्रेसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. वारकऱ्यांच्या सोयीसाठी रेल्वे प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करून विशेष रेल्वेची व्यवस्था करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

विशेष रेल्वे सुरू झाल्यामुळे जळगाव, भुसावळ, रावेर, यावल, मुक्ताईनगर तसेच परिसरातील भाविकांना मोठा दिलासा मिळाला असून वारकरी आणि नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांचे आभार मानले.

## सोशल मीडियाच्या सुयोग्य वापरातून करिअरला नवी दिशा - मोहिनी नेहते

### धनाजी नाना महाविद्यालयात कंटेंट क्रिएशन विषयावरील एकदिवसीय परिसंवाद; विद्यार्थ्यांना डिजिटल करिअरच्या संधींचे मार्गदर्शन



रावेर (प्रतिनिधी) : सध्याच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर वाढला असून कंटेंट क्रिएशनचे योग्य प्रशिक्षण आणि प्रभावी मार्गदर्शन मिळाल्यास प्रत्येकाला अर्थार्जनासह स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करता येते. विनाकारण रिल्स पाहण्यात वेळ घालवण्यापेक्षा स्वत:तील नाविन्यपूर्ण कलागुण सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांसमोर मांडल्यास करिअरला नवी दिशा मिळू शकते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध लेखिका व सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर सौ. मोहिनी नेहते यांनी केले.

तापी परिसर विद्या मंडळ संचलित धनाजी नाना महाविद्यालयात आयोजित 'कंटेंट क्रिएशन : संधी, कौशल्य आणि करिअर' या विषयावरील एकदिवसीय परिसंवादात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघुळदे होते. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. कल्पना पाटील, डॉ. हरीश नेमाडे तसेच प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परिसंवादात कंटेंट क्रिएशन म्हणजे काय, त्यासाठी आवश्यक कौशल्ये, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, दजेर्दार आशय निर्मिती, सोशल मीडियाचा जबाबदारीने उपयोग आणि त्यातून उपलब्ध होणाऱ्या करिअरच्या विविध संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

# सावदा पालिकेची जम्बो सभा : 33 पैकी 32 विषय मंजूर;

### अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे व प्रशासनावर जोरदार चर्चा

सावदा प्रतिनिधी–

तब्बल चार महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर पार पडलेल्या सावदा नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नागरिकांच्या हिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. नगराध्यक्षा रेणुका पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या जम्बो सभेत एकूण ३३ विषयांपैकी ३२ विषयांना सवार्नुमते मंजुरी देण्यात आली. तसेच गट क्रमांक ६१ मधील आरक्षण वगळण्याचा वादग्रस्त प्रशासकीय निर्णय सभागृहाने रद्द करत प्रशासनाला मोठा धक्का दिला.

सभेच्या प्रारंभी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करण्यात आले.

सभेत ८० फुटी रस्त्यावरील अतिक्रमणाचा मुद्दा चांगलाच गाजला. एका बाजूला अतिक्रमणधारकांनी अतिक्रमण कायम ठेवून पाणीपुरवठ्यासाठी नळजोडणी देण्याची मागणी केली, तर दुसऱ्या बाजूला खासगी प्लॉटधारकांनी अतिक्रमणामुळे रस्ता बंद होत असल्याचे सांगत तातडीने अतिक्रमण हटविण्याची मागणी केली.

या विषयावर यापूर्वी उपोषणही झाल्याचे गटनेते राजेश वानखेडे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. अतिक्रमणधारकांना पर्यायी जागा उपलब्ध करून दिल्यास दोन्ही बाजूंचा प्रश्न मार्गी लागू शकतो, अशी सूचनाही त्यांनी केली. अखेर सर्व संबंधितांची समन्वय बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले.

विनापरवानगी बांधकामे नियमाकूल करण्याच्या प्रस्तावावरही सभागृहात जोरदार चर्चा झाली.

## नूतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त भक्तिमय दिंडी सोहळा उत्साहात

चिनावल (प्रतिनिधी) : आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त नूतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शुक्रवारी (दि. २४) भक्तिमय वातावरणात भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. टाळ–मृदुंगाच्या गजरात, ज्ञानोबा–तुकाराम आणि पांडुरंग विठ्ठल च्या अखंड नामघोषाने संपूर्ण विद्यालय परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. वारकरी वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे दिंडी सोहळ्याला विशेष आकर्षण लाभले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुनील महाजन, चेअरमन खेमचंद्र पाटील आणि सेक्रेटरी गोपाळ पाटील यांच्या हस्ते श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या मूतीर्चे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर पारंपरिक टाळ, मृदुंग, अभंग, हरिनामाच्या गजरात आणि फुगड्यांच्या तालावर दिंडीला प्रारंभ झाला. विद्यार्थ्यांनी परिसरातून दिंडी काढत वारकरी संप्रदायाची परंपरा जपत आषाढी एकादशीचा संदेश दिला.

यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारिणी सदस्य मनोहर पाटील, नूतन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य संदीप चौधरी, नूतन प्राथमिक विद्यालयाचे प्राचार्य गणेश बाविस्कर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नूतन इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य जगदीश धांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यालयीन कर्मचारी वैभव महाजन यांनीही नियोजनात मोलाचे योगदान दिले. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संत परंपरेचे विचार, वारकरी संप्रदायाची संस्कृती, भक्ती, समता, एकात्मता आणि सामाजिक मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी विद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक करत अशा सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला निश्चितच चालना मिळत असल्याचे मत व्यक्त केले.